जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2019
लोकमत

## चर्चेतील व्यक्तीशी थेट संवाद

> सिलिकॉनच्या वापरापासून बनविलेले सोलर परवडणारे नाही. कमी खर्चातील सोलर सेल बनविणे माझे ध्येय आहे. - सत्यजित पाटील

सत्यजित पाटील; पदवीपासूनच संशोधन गरजेचे

# कमी खर्चातील 'सोलर सेल' बनविण्याचे ध्येय

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

*कोल्हापूर : विज्ञान शाखेतील विद्यार्थी म्हटले की, संशोधन, अभ्यास इतकेच अनेकदा डोळ्यांसमोर येते. मात्र, त्याला काहीशी बगल देत अर्जुनवाडा (ता. राधानगरी) येथील सत्यजित संजय पाटील याने अभ्यास, संशोधन करीत शिवाजी विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीच्या राष्ट्रपती सुवर्णपदकावर या वर्षी नाव कोरले आहे. हे पदक मिळविण्यामागील त्याची प्रेरणा, भविष्यातील संशोधनामधील त्याचे ध्येय, आदींबाबत त्याच्याशी साधलेला हा संवाद...*

प्रश्न : राष्ट्रपती सुवर्णपदक मिळविण्याची प्रेरणा कशी मिळाली?

उत्तर : शिवाजी विद्यापीठातील माझे सीनिअर श्रेयस मोहिते, सोनाली बेकनाळकर यांचा दीक्षान्त समारंभात राष्ट्रपती सुवर्णपदकाने सन्मान झालेला पाहून हे पदक मिळविण्याबाबतची प्रेरणा मला मिळाली. श्रेयस, सोनाली यांना मी भेटलो. त्यांच्याकडून मी या पदकाबाबतची नियमावली, पात्रता, आदींची माहिती घेतली. गेल्या दोन वर्षांपासून त्यासाठी तयारी सुरु केली. विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागात एम. एस्सी.च्या द्वितीय वर्षातील शिक्षण घेत विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेणे सुरु केले. राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), महाराष्ट्र विवेक वाहिनी, आदींच्या माध्यमांतून विविध उपक्रमांत योगदान दिले. जिद्द, सातत्य व आत्मविश्वास या त्रिसूत्रीचा अवलंब केल्याने या पदकावर मला नाव कोरता आले. माझ्या यशात आई-वडील, शाळा ते विद्यापीठापर्यंतचा शिक्षकवर्ग, मित्रांचे पाठबळ, मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले.

प्रश्न : पुढील ध्येय काय आहे?

उत्तर : वडील प्राध्यापक असल्याने त्यांच्या मार्गदर्शनानुसार विज्ञान शाखेमध्ये करिअर करण्याचे ठरविले. विवेकानंद महाविद्यालयात बी. एस्सी. अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षापासून विद्यापीठातील प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनात कार्यरत झालो. पदवी घेतल्यानंतर विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागामध्ये एम. एस्सी.करिता प्रवेश घेतला. सोलर सेल (सौरघटक) आणि सुपर कपॅसिटर हे माझ्या अभ्यास आणि संशोधनाचे विषय आहेत. 'आविष्कार संशोधन महोत्सवा'सह विविध संशोधन परिषद, चर्चासत्रांमध्ये या विषयांच्या अनुषंगाने शोधनिबंध सादर केले आहेत.

**संडे स्पेशल मुलाखत**



### इंटरनेट, सोशल मीडियापेक्षा चर्चा करा

करिअरचे क्षेत्र कोणतेही असू दे; त्यामध्ये यशस्वी होण्यासाठी तरुणाईने जिद्द व कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे. पुस्तके, इंटरनेट, सोशल मीडियावर आपल्या विषयांबाबतची माहिती मुबलक प्रमाणात मिळेल. त्याच्या जोरावर परीक्षांमध्ये आपण गुणांची कमाई करुन उत्तीर्ण होऊ. मात्र, प्रत्यक्षातील ज्ञान मिळविण्यासाठी शिक्षक, तज्ज्ञ, सीनिअरशी चर्चा करावी. ते निश्चितपणे उपयुक्त ठरणार असल्याचे सत्यजित याने सांगितले.

### विद्यापीठाकडून अपेक्षा काय?

विद्यार्थ्यांकडून समाजासाठी उपयुक्त ठरणारे, नवनिर्मिती करण्याच्या दृष्टिकोनातून संशोधन व्हावे. त्याला महाविद्यालय आणि विद्यापीठाकडून प्रोत्साहन आणि पाठबळ मिळावे. त्या अनुषंगाने विविध योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. असे झाले तरच संशोधनातील आपला टक्का वाढणार आहे. विद्यापीठाने नुकतीच पदवी पातळीवरील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रोत्साहन देण्याची चांगली योजना जाहीर केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2010
तरुण भारत


# डॉ. जयसिंगराव पवार यांना 'शिव-जीवन गौरव' जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीच्या वतीने रविवारी (दि. २४) दुपारी ४ वाजता शिव-महोत्सवाचे आयोजन केले आहे. महोत्सवात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना 'शिव-जीवन गौरव' तर ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांना 'शिव-ताराराणी' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठातील लोककला केंद्रात हा कार्यक्रम होणार आहे.

'शिव-महोत्सव'मध्ये राज्याचे उच्चशिक्षण संचालक डॉ. धनराज माने, आमदार सतेज पाटील, शाहू शिक्षण प्रसारक सेवा मंडळावच्या सचिव डॉ. सायरस पुनावाला, इंटरनॅशनल स्कूलच्या अध्यक्षा विद्याताई पोळ उपस्थित राहणार आहेत.

रविवारी सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमात गायिका अमृता पाटील, 'चला हवा येऊ द्या-होऊ दे व्हायरल' फेम अभिजीत रोकडे, संगीत सम्राट फेम अमोष मोहिते यांच्याबरोबर गायक सूरज नाईक, सँड आर्टिस्ट अमित माळकरी, ओंकार शेटे, नृत्य दिग्दर्शक सागर बगाडे, चंद्रकांत पाटील यांचा कार्यक्रम असणार आहे.


डॉ. जयसिंगराव पवार

**शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आज शिवमहोत्सव**

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. अण्णासाहेब खेमणर, डॉ. सरदार जाधव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, सुनिल पाटील, सचिन मांगले, डॉ. डी. के. गायकवाड, रोहीत पाटील, शीतल माने, शशिकांत बोराळकर, मंदार पाटील, अभिजित राऊत, ऋतुराज माने उपस्थित राहणार आहेत. तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. प्रविण कोडोलीकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 FEB 2010

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात आज शिवमहोत्सव

## डॉ. जयसिंगराव पवार यांना शिवजीवन गौरव पुरस्कार; भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** येथील शिवाजी विद्यापीठातील आजी-माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अर्थात 'शिवमहोत्सव' रविवारी (दि. २४) दुपारी ४ वाजता विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

डॉ. सायरस पुनावाला इंटरनॅशनल स्कूल प्रस्तूत व शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीतर्फे आयोजित या महोत्सवात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांना 'शिव-जीवन गौरव' तर प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांना 'शिव-ताराराणी' पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. शिवाय 'सांस्कृतिक संध्या' कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे संकल्पक व संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी दिली आहे.

रविवारी सायंकाळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील तर आमदार सतेज पाटील, उच्चशिक्षण संचालक डॉ. धनराज माने आणि डॉ. सायरस पूनावाला इंटरनॅशनल स्कूलच्या अध्यक्षा विद्याताई पोळ प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. औरंगाबादची गायिका अमृता पाटील, 'चला हवा येऊ द्या, होऊ दे व्हायरल' फेम अभिजित रोकडे, संगीत सम्राटफेम अमोष मोहिते यांच्याबरोबरच गायक सूरज नाईक, अमित माळकरी, ओंकार शेटे, नृत्यदिग्दर्शक सागर बगाडे, चंद्रकांत पाटील या सर्वांच्या सहकार्यातून हा सांस्कृतिक कार्यक्रम साकारण्यात आला आहे. राजारामियन ग्रुपतर्फे अजय-अतुल यांच्या गीताचा नजराणाही पेश करण्यात येणार आहे. प्रा. सत्यजित कोसंबी हे निवेदन करणार आहेत. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. अण्णासाहेब खेमणार, डॉ. सरदार जाधव, परीक्षा संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांना विनामूल्य खुला आहे, असे डॉ. कोडीलीकर यांनी सांगितले.